# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

प्रेसनोट क्रमांक २५८/२०२४ दिनांक:- ०९/०७/२०२४.

**"Credit card द्वारे ऑनलाईन फसवणुक झालेली ४७,०८८/-रक्कम तक्रारदार यांना परत करण्यात सायबर पोलीस ठाण्यास यश"**

मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील मिरारोड पोलीस ठाणे कार्यक्षेत्रात राहणारे तक्रारदार नामे श्री. तनवार यांचे मोबाईलवर मॅसेजद्वारे क्रेडिट कार्ड अपडेट करीता लिंक प्राप्त झाली. तक्रारदार लिंकवर क्लिक करुन नमुद केल्याप्रमाणे सविस्तर माहिती भरली. त्यानंतर यांचे क्रेडिट कार्डाचे खात्यातुन ४७,०८८/- रु कपात झाल्याबाबत मॅसेज त्यांना प्राप्त झाला. मोबाईलवर प्राप्त लिंक बनावट असुन त्याद्वारे आपली आर्थिक फसवणुक झाल्याचे तक्रारदार यांचे लक्षात आल्याने तक्रारदार यांनी सायबर पोलीस ठाणे येथे तक्रार दिली होती.

**(सायबर पोलीस ठाणे आवक अर्ज क्र.१०६४/२०२४ दिनांक ०१/०५/२०२४.)**

वरील प्राप्त तक्रारीचे अनुषंगाने तक्रारदार यांचे व्यवहारचे अवलोकन करुन क्रेडिट कार्ड विभागास पत्रव्यवहार करुन तक्रारदार यांची रक्कम गोठवुन मुळ खात्यात वर्ग होणेबाबत तात्काळ पत्रव्यवहार करण्यात आला. **सदर पत्रव्यवहाराचे अनुषंगाने तक्रारदार यांची फसवणुक झालेली रक्कम ४७,०८८/- तक्रारदार यांचे मुळ खात्यावर परत मिळविण्यात आलेली आहे.**

**फसवणूक टाळण्यासाठी घ्यावयाची काळजी...**

- **बँक/क्रेडीट कार्ड बँक कोणत्याही प्रकारे ग्राहकांना एसएमएस किंवा फोनवर संपर्क साधून वैयक्तिक गोपनीय माहिती विचारणा करत नाही.**
- **अनोळखी लिंक अगर मॅसेज प्राप्त झाल्यास पडताळणी केल्याशिवाय कारवाई करु नये.**
- **अनोळखी मोबाईल धारकांना आपली वैयक्तिक माहिती/ आर्थिक व्यवहारासंबंधीत माहिती उघड करु नये. आपले बँक खाते, जन्मदिनांक, OTP वा इतर वैयक्तीक माहीती उघड करू नये.**
- **ऑनलाईन फसवणूक झाल्यास तात्काळ १९३० तसेच www.cybercrime.gov.in वर संपर्क करुन आपली तक्रार नोंदवावी.**
- **ऑनलाईन फसवणूक झाल्यास तात्काळ बँकेला संपर्क करावा.**

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील नागरीकांना आवाहन करण्यात येते की, अशा प्रकारे फसवणूक करणे कायदयाने गुन्हा आहे. असा प्रकार आपल्यासोबत घडला असल्यास तात्काळ नजीकच्या पोलीस ठाणेस संपर्क साधावा. तसेच www.cybercrime.gov.in अथवा 1930 या हेल्पलाईनवर संपर्क साधून तक्रार द्यावी.**

सदरची कामगिरी श्री.अविनाश अंबुरे पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. मदन बल्लाळ, सहा.पोलीस आयुक्त (गुन्हे), मि.भा.व.वि.पोलीस आयुक्तालय यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री.सुजितकुमार गुंजकर, सपोनि/स्वप्नील वाव्हळ, पोउनि/प्रसाद शेनोळकर, सफौ/मिलाग्रिस फर्नांडिस, पोअं/सावन शेवाळे यांनी पार पाडली आहे.

**सायबर फसवणुक हेल्पलाईन क्रमांक :- १९३०**

**सायबर फसवणुक हेल्पलाईन वेबसाईट :- www.cybercrime.gov.in**

**----0000----**